**पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 07252-232134.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

क्रमांक: पोअवा/आस्था/गणवेष भत्ता/२०२४-२५/12180/२०२४, वाशिम. दिनांक :- 11 DEC 2024

## आदेश

विषय :- पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरिक्षक यांना गणवेष साहित्या ऐवजी गणवेष भत्ता मंजुर करण्याबाबत सन २०२४-२५

***

मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे यांचे पत्र क्रमांक DGP-D१८०१३/८/२०२४ DESK १८ दि. १२/०६/२०२४, अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेष साहित्या ऐवजी गणवेष भत्ता वित्तीय वर्ष २०२४-२०२५ करीता प्रत्येकी रु.५,१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट) इतका गणवेष अनुदान मा.पोलीस महासंचालक , म.रा.मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक. पोमसं/१८/९० गणवेष अनुदान/४०/२०१२ मुंबई दिनांक ०४/०७/२०१६ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

१) गणवेष भत्ता वाटपाकरीता १ एप्रिल ते ३१ मार्च असे गटवर्ष आहे. त्या गटवर्षा मध्ये कोणत्याही महिन्यात नविन पोलीस शिपाई नियुक्त झाल्यास, त्या पोलीस शिपाईस नियुक्तीनंतर त्यांना रु.५१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट)इतका गणवेष भत्ता मंजूर करण्यात येत आहे.

२) तसेच जे पोलीस कर्मचारी (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक) जर निलंबीत असेल, तर निलंबीत कालावधीत सदर कर्मचारी यांना गणवेष परिधान करण्यास मनाई आहे. यास्तव त्यांना गणवेष भत्ता अनुदानातुन देण्यात येणार नाही. सदर कर्मचारी यांना जर पुन्हा सेवेत रुजु झाले आणि त्या दिनांकापासुन वित्तीय वर्ष पुर्ण होण्यास तिन महिन्यापेक्षा जास्त कालावधी असल्यास(०१ जानेवारी पुर्वी रुजु झाल्यास)अशा पोलीस कर्मचाऱ्यास त्या वित्तीय वर्षातील रु.५१६७/- इतका गणवेष भत्ता देय राहील. त्यापुढील कालावधीचा गणवेष भत्ता प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये नियमाप्रमाणे देय राहील.

३) सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना जर अभावित (Adhoc) पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली असेल, तर त्यांना मुळ पदाचा गणवेष भत्ता अनुज्ञेय राहील. तसेच एखाद्या वित्तीय वर्षात जर अभावित / तात्पुरती पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यास त्या पदाचा गणवेष भत्त देण्यात आला असेल आणि त्याच वित्तीय वर्षात त्यांची पदोन्नती संपुष्टात येवुन, त्यांना मागील पदावर (सपोउपनि) नियुक्ती देण्यात आलीस असेल तर एकाच वित्तीय वर्षात दुसरा गणवेष भत्ता देण्यात येवु नये. त्याचप्रमाणे जर एखाद्या वित्तीय वर्षात पोलीस कर्मचारी यांना सपोउपनि पदाचा गणवेष भत्ता देण्यात आला असेल, आणि त्यानंतर त्यांना त्याच वित्तीय वर्षात अभावित/तात्पुरती पोउपनि पदोन्नती देण्यात आला असेल, तर एकाच वित्तीय वर्षात पोउपनि पदाचा दुसरा गणवेष भत्ता देण्यात अनुज्ञेय राहणार नाही.

४) वित्तीय वर्ष सुरु झाल्यापासुन (१ एप्रील) पुढील ३ महिन्याच्या आत (३० जुन पुर्वी) सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांना त्या वित्तीय वर्षाचे गणवेष भत्या अनुज्ञेय नाही. माहे जुलै किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांना फक्त त्या वित्तीय वर्षातील रु.५१६७/- इतका गणवेष भत्ता देय राहील.

| अ.क्र | पदनाम | अंमलदार नाव | नेमणुक ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | मोवाजो वर्ग -२ | अविनाश जयराम राठोड | मो.प.विभाग वाशिम |

२/- सदरचा खर्च गणवेष भत्ता अनुदान वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता मुख्य लेखाशिर्ष २०५५-पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (००) (०१)-जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) या अंर्तगत "२५- पोषाख,तंबु आणि भांडारे" या उद्दिष्टाखाली मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

३/- वर नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे वेतनाचे खाते मधे प्रत्येकी रु.५,१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट) इतका गणवेष अनुदान वित्तीय वर्ष २०२४-२०२५ करीता जमा करुन तसा पुर्तता अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

(अनुज तारे )
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

वेतन लिपीक (यांना दोन प्रतित)/ रोखपाल/आकस्मिक खर्च लिपीक ( यांना दोन प्रतित ) पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

प्रमुख लिपीक लेखाशाखा /संगणक कक्ष/डिपीजी लिपीक पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे आदेश सर्वा करीता पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेत स्थळावर सर्वाकरीता प्रसिध्द करुन दयावेत, तसेच सर्व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार, वाशिम जिल्हा / सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा/राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे संकेत स्थळावर ई-मेल द्वारे त्वरीत कळवावे.

प्रत माहितीस :-

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार, वाशिम जिल्हा / सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा/राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम.